नियमीत फौजदारी खटला क्र. **९४/२०२४**
निशाणी क्र. **१४/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०१** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **संपदा संदीप नागावकर** |
| वय सुमारे | : | ५३ वर्षे, व्यवसाय : नोकरी |
| निवासस्थान | : | मु. पिंपळभाट, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. प्रसाद पाटील यांचेमार्फत</u>** :

०१. दि. ०५/०६/२०२४ रोजी सायं. ६:३० ते ७:०० वाजताच्या दरम्यान पिंपळभाट येथील माझ्या राहत्या घराच्या पार्कींगमध्ये घटना घडली होती. तेथे माझे पती व आरोपी यांचा पार्कींगवरुन वाद चालू होता. मी तेथे गेले. तेथे गेल्यावर आरोपी व माझे पतीमध्ये बाचाबाची चालू होती. मी मध्ये गेली असता मला कोणाचा तरी धक्का लागला व मी पडले. किरण पवार, निलीमा पवार व माझे पती यांच्यामध्ये वाद चालू होता. घटनेनंतर मी पोलीस ठाण्यात गेले त्यानंतर सिव्हील हॉस्पीटलमध्ये गेले. मी अलिबाग पोलीस ठाण्यात तक्रार दिली. आता मला दाखवण्यात आलेली तक्रार तिच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. पी–१** म्हणजेच **निशाणी क्र. १५** देण्यात येते. आज रोजी दोन्ही आरोपी न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. क्रांतीदिप डवले यांचेमार्फत</u>** :

०२. माझी आरोपीविरुद्ध कोणतीही तक्रार राहीलेली नाही. गर्दी असल्यामुळे मला कोणाचा धक्का लागला हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे

खरे आहे की, मी आरोपींविरुद्ध गैरसमजूतीने तक्रार दाखल केलेली आहे. आमची न्यायालयाबाहेर तडजोड झालेली आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.
दिनांक : **०७/०४/२०२६**.

( **एम्. बी. अत्तार** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **९४/२०२४**
निशाणी क्र. **१६/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०२** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **संदीप वसंत नागावकर** |
| वय सुमारे | : | ५९ वर्षे, व्यवसाय : सेवानिवृत्त |
| निवासस्थान | : | मु. पिंपळभाट, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. प्रसाद पाटील यांचेमार्फत</u>** :

०१. दि. ०५/०६/२०२४ रोजी गाडीच्या पार्कींगवरुन मी किरण पवार याला सांगत होतो की मला पण गाडी पार्क करायची आहे. तो मला सांगत होता की गाडी पार्क करु नको. आमच्यात बोलणे चालू होते. माझ्या पत्नीचा हात फ्रॅक्चर झाला होता. कोणीतरी धक्काबुक्की केली होती.

(**साक्षीदार पूर्वी दिलेल्या जबानीपेक्षा विसंगत साक्ष देत असल्याने सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उत्तरसूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली**.)

**<u>उलटतपास सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. प्रसाद पाटील यांचेमार्फत</u>** :

०२. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने माझ्यासोबत सुरुवातीला हुज्जत घातली. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी माझी पत्नी तेथे आली. हे म्हणणे खरे आहे की, माझी पत्नी मला वाचवण्यासाठी मध्ये आली. हे म्हणणे खरे आहे की, किरण पवार मला टकल्या असे म्हणाला व मला शिवीगाळ केली. हे म्हणणे खरे आहे की, निलीमा पवार यांनी माझ्या पत्नीला हलकट, नालायक अशी शिवीगाळ केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी माझ्या पत्नीचा हात फ्रॅक्चर केला होता.

हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी शिवीगाळ केली, मारहाण केली म्हणून आम्ही तक्रार दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना शिक्षा होवू नये म्हणून मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**.

**उलटतपास आरोपींकरीता वकील श्री. क्रांतीदिप डवले यांचेमार्फत** :

०३.        हे म्हणणे खरे आहे की, पार्कींगमध्ये भरपूर गर्दी होती. हे म्हणणे खरे आहे की, कोणी धक्काबुक्की केली हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी व आरोपींची न्यायालयाबाहेर तडजोड झालेली आहे. माझी आरोपींविरुद्ध आता कोणतीही तक्रार राहिलेली नाही.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.                                         ( **एम्. बी. अत्तार** )

दिनांक : **०७/०४/२०२६**.          मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.